तरुण भारत

रविवार, १७ फेब्रुवारी २०१९

# शेतकऱ्यांची स्थिती व्यवस्थेला अडचणीत आणणारी

## खासदार राजू शेट्टी : शेतकऱ्याची व्यथा, वेदना दशा : समस्या व आव्हाने चर्चासत्रात मांडले मत

प्रतिनिधी
कोल्हापूर

देशाच्या अर्थव्यवस्थेचा कणा असलेला शेतकरी व्यवस्थेतील चुकीच्या धोरणामुळे सर्वच स्तरावर अडचणीत आला आहे. मात्र शेतकऱ्यांची ही अवस्था सरकारी व्यवस्थेलाच अडचणीत आणणारी ठरणार आहे, असे मत खासदार राजू शेट्टी यांनी मांडले. येथील कमला कॉलेजच्यावतीने आयोजीत 'शेतकऱ्यांची व्यथा, वेदना दशा: समस्या व आव्हाने" या चर्चासत्रात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी डॉ. क्रांतीकुमार पाटील होते.

यावेळी खासदार राजू शेट्टी म्हणाले, वीस वर्षे चळवळीत काम करीत असताना शेतकऱ्यांचे दु:ख जवळून पाहिले आहे. देशातील २०९ शेतकरी संघटना एकत्र आल्या आणि याचे चिंतन आज महाविद्यालयीन पातळीवर होत आहे. त्याचे स्वरुप काय आहे यावर चर्चा होत आहे, हे चळवळीचे यश आहे. शेतकऱ्यांच्या शोषण नितीवर ज्या पद्धतीने बोलले जाते त्याची अंमलबजावणी प्रत्यक्षात होताना दिसत नाही. शेतकऱ्याकडे पैसे असते तर समाजातील सर्व घटक संतुलीत पद्धतीचे जीवन जगू शकतो. शेतकऱ्याला उसाचे पैसे मिळालेले नाहीत. त्यामुळे बाजारपेठा थंड आहेत. गरजा पूर्ण झालेल्या घटकाकडून व्यवहारात चलन येत नाही. शेतकऱ्याचा संपूर्ण पैसा अर्थव्यवस्थेत खेळतो. प्रत्येक घटकात त्याचा पाझर आहे. त्यामुळे शेतकऱ्यांकडे पैसे येणे महत्वाचे आहे. शेतकरी नागवला तर अर्थव्यवस्था कशी अडचणीत येते हे आजच्या परिस्थितीवरुन स्पष्ट होते. ही परिस्थितीत बदलण्यासाठीच शेतकऱ्यांचा लढा जिवंत राहिला पाहिजे अशी स्पष्ट भूमिकाही त्यांनी यावेळी मांडली.



कोल्हापूर : कमला कॉलेजच्यावतीने आयोजीत चर्चा सत्रात मार्गदर्शन करताना खासदार राजू शेट्टी. व्यासपीठावर डॉ. क्रांतीकुमार पाटील, एस. एन. पवार, प्राजक्त पाटील, डॉ. भारत पाटणकर, संपतराव पवार, डॉ. निता धुमाळ, सुजय पाटील, तेजस्वीनी मुडेकर आदी.

शेतकऱ्यांच्या आत्महत्या रोखण्याची जबाबदारी सरकारची आहे. देशातील शेतकऱ्यांचा दरडोई उत्पन्न दर घटत आहे. विविध योजनांसाठी शेतकऱ्यांच्या जमिनी काढून घेतल्या जात आहेत. त्यांना पुरेसा मोबदला दिला जात नाही. दुष्काळ, वादळ यासारख्या नैसर्गिक आपतीमुळे शेतकऱ्यांचे नुकसान होते. त्यांचे प्रश्न सोडवण्यासाठी चळवळी नेटाने उभ्या राहिल्या पाहिजेत. अशी भूमिका मांडली.

**शेतीला तंत्रज्ञानाची जोड आवश्यक- प्रा. अस्मिता पाटील**

शेतीला वैज्ञानिक दृष्टीकोण देण्याची गरज आहे. त्यामुळे शेतकऱ्यांचा उत्पादन खर्च कमी होईल अशी भूमिका प्रा. अस्मिता पाटील यांनी मांडली. त्या म्हणाल्या, प्रगत राष्ट्रात फळावर प्रक्रिया करुन त्याचा रस दोन ते ती वर्षे टिकवला जातो. कोणत्याही हवामानात शेती उत्पादने मिळू शकतात. त्या प्रमाणे आपल्याकडे मुबलक प्रमाणात उपलब्ध असलेल्या उसाच्या रसावर प्रक्रिया करुन तोट जास्ती जास्त कसा टिकेल यासाठी संशोधन होण्याची गरज आहे. त्यामुळे शेतकऱ्यांचे आर्थिक उत्पन्न वाढण्यास मदत होईल.

परिसंवादाचा आढावा डॉ. निता धुमाळ यांनी घेतला. प्रा. जालंदर पाटील, डॉ. क्रांतीकुमार पाटील यांनी मनोगत व्यक्त केले. अनघा फाटक, वर्षा मैंदर्गी यांनी सूत्रसंचालन केले. एन. व्ही. पोवार, अनिल घस्ते, वर्षा साठे, विद्या बंडदारे यांच्यासह विद्यार्थी उपस्थित होते.

**...तरच बाजारात उलाढाल**

शेतीतील उत्पादनाचे पैशात रुपांतर झाले पाहिजे, तरच शेतकऱ्यांच्या हातात पैसे खेळतील आणि बाजारत उलाढाल वाढू शकते. अशी भूमिका मांडत डॉ. भारत पाटणकर म्हणाले, इतिहसातूनच भविष्याची निर्मिती होते. पारंपरिक शेती बाजुल पडून ग्रीन हाऊस संकल्पना पुढे आली आहे. शेतकऱ्यांचा उत्पादनस्थर वाढण्यासाठी त्याला आवाश्यक साधन सामग्री मोफत काही अल्प दरात उपलब्ध करुन दिली पाहिजे.

–डॉ. भारत पाटणकर